# "नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


**।। काव्य शास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम् ।।**

मूल्य रु. ५


**क्रमांक ३ वर्ष : ४३ ऑक्टोबर–डिसेंबर २०२१**

**BOOK PACKET**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


**।। श्री रामेश्वर प्रसन्न ।।**







## सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील मुंबईतील प्रति मंगेशी श्री रामेश्वर मंदिर नूतनीकरणासाठी भक्तगणांना आवाहन

जोगेश्वरी पूर्व येथे बहुतांश सारस्वतांची ५००–६०० कुटुंबे सरस्वती बाग या निसर्गरम्य वसाहतीत पिढ्यान् पिढ्या गुण्यागोविंदाने नांदत आहेत. सरस्वती बागेची स्थापना शंभर वर्षांपूर्वी म्हणजे १९१९ साली झाली. तेथील रहिवाशांची धार्मिक भूक शमविण्यासाठी कर्त्या स्थानिक मंडळींनी पुढाकार घेऊन १९२६ मध्ये तेथे श्री रामेश्वर मंदिराची स्थापना केली. गर्भकुडीत शिवलिंगाच्या प्राणप्रतिष्ठेसमयी सद्भक्ती मंदिराचे टाकी महाराज आवर्जून उपस्थित होते. महाराजांच्या वतीने श्री मंगेशी येथे प्रसाद लावला व श्रीनी आशीर्वाद दिला की मी श्री रामेश्वर मंदिरात पूर्णांशाने वास करीत आहे. त्यानुसार वर्षभर मंदिरात मंगेशीच्याच धर्तीवर अभिषेक, लघुरुद्रसह सर्वप्रकारच्या पूजा, रंगपूजा, भजन, कीर्तन, प्रवचन असे कार्यक्रम, रामनवमी, माघ पौर्णिमासारखे उत्सव कार्यान्वित होतात व त्यावेळी मुंबईतील ठिकठिकाणाहून भक्तगण श्रद्धेने उपस्थित असतात. पु.लं.चं बालपण सरस्वती बागेत गेले. त्यानीही एका लेखात नमूद केले आहे की 'रामेश्वर देवळात कीर्तन उभे राहिले की जेवणाबिवणाची शुद्ध नसे' अशी या मंदिराची महती, असे हे रामेश्वर मंदिर पुढील चार वर्षांनी शतक महोत्सव साजरा करणार आहे. या प्रसंगाचे औचित्य साधून विश्वस्त मंडळींनी भव्य प्रमाणात दुरुस्ती करणे व सुशोभीकरण हाती घेतले आहे. प्रदक्षिणेच्या परिक्रमा भागात मार्बलचे फ्लोरींग, आवश्यक तेथे डागडुजी, छतातून होणारी गळती थांबवणे, खिडक्या दरवाजांची दुरुस्ती अशी विविध कामे करण्याचे आहे. याचा अंदाजे खर्च रु. ५० लाख एवढा अपेक्षित आहे. या निवेदनातर्फे समस्त भक्तगणांना आवाहन आहे की त्यांनी ही श्रीच्या सेवेची सुसंधी समजून सढळ हस्ते देणग्या द्याव्या. रु. २५ हजार व अधिक देणगी देणाऱ्या भक्तांचा ऋणनिर्देश दर्शकीय फलकावर केला जाईल. देणगी Shri Rameshwer Mandir Sansthan यांच्या नावे धनादेश काढून NKGSB बँकेच्या जोगेश्वरी शाखेतील १ नंबरच्या खात्यावर जमा करावी. किंवा

**Saraswat Bank**, Andheri (E) Branch

SB A/c. No. 019200100029558 I IFSC Code : SRCB0000019

या खात्यावर जमा करावी. देणगीदारांनी आपले नाव, पत्ता, पॅन नंबर, संपर्क नंबर खालील विश्वस्तांपैकी कुणालाही मेसेज करावे म्हणजे पावती घरपोच देता येईल.

**किशोर भेंडे:** ९७६९९०३००१ **शिवानंद बोरकर :** ९८२०८५८३४४

**प्रणव मुझुमदार:** ९८२११८८३४०, **शंकर नाडकर्णी :** ९८२०१९५४८४

**उदय नाडकर्णी :**९७६९३५२२३७, **राजाराम वागळे:** ९८६९४४४०२८

## संपादकीय

### श्री अरुण कसबेकर यांच्यातर्फे वृद्धसेवानिधीसाठी आणखी ३२ लाख रुपयांची देणगी –समाज सेवा लाभार्थींना दर महिना वाढीव किमान शंभर रुपये साहाय्य देणे शक्य

आपल्या ज्ञाती संबंधित कार्यात विशेष रस घेणारे व मुखपत्रिकेचे एक लोकप्रिय स्तंभ लेखक श्री. अरुण भास्कर कसबेकर गेली १४ वर्षे सातत्याने विविध प्रसंगी वृद्धसेवानिधीसाठी सालिना एक तरी भरघोस देणगी देत असतात. या सतत मिळणाऱ्या देणग्यांच्या संदर्भात प्रकर्षाने एक तुलना कराविशी वाटते. तीस कोटी उत्पन्न असलेल्या व्यक्तीने तीन लाख रुपयांची देणगी देणे व तीन कोटी उत्पन्न असलेल्या व्यक्तीने तेवढ्याच रकमेची देणगी देणे यांत फरक आहे. श्री. कसबेकर हे दुसऱ्या गटात मोडतात त्यामुळे ते जास्त कौतुकास पात्र आहेत. बहुतेक देणगीदार देणग्या देतात त्या आपल्या आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ असतात. पण श्री. कसबेकर देणग्या देतात त्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ देणग्या देतात, एवढेच नव्हे तर कृतज्ञतेच्या भावनेने आपले गुरुजन, संकटाच्या वेळी ज्यांनी त्यांना निरलसबुद्धीने, मग तो टॅक्सी चालक असला तरी, साहाय्य केले अशा व्यक्तींच्या स्मृतीप्रीत्यर्थही देणग्या देत असतात.

श्री. कसबेकर यांचे अचाट बुद्धिमत्तेचे एक काका श्री. प्रभाकर दत्तात्रय कसबेकर यांची १ ऑक्टोबर २०२१ ही जन्मशताब्दी. या काकांनाही ज्ञातीबद्दल विशेष कणव होता. त्याचे एक प्रतीक म्हणजे त्यांच्या इच्छापत्रानुसार आपला संघ व आपली एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थाना रु. १,१९,००० रकमेच्या देणग्या मिळाल्या आहेत. काकांच्या जन्मशताब्दीच्या औचित्याने श्री. कसबेकर यांनी अलीकडेच वृद्धसेवानिधीसाठी आणखी ३२ लाख रुपयांची देणगी दिली आहे. श्री. पी. डी. कसबेकर हे एक काका व दुसरे एक अल्पवयीन काका श्री. आनंद यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ प्रत्येकी एक लाख, आपले आजी आजोबा श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. दत्तात्रय रामचंद्र कसबेकर, आई वडील श्रीमती इंदुमती व श्री. भास्कर दत्तात्रय कसबेकर व सासू सासरे श्रीमती शांताबाई व श्री. नीलकंठ पांडुरंग पिकळे या तीन जोडप्यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी दहा लाख रुपये अशा प्रकारे एकूण ३२ लाख रुपयांची देणगी दिली आहे. या देणगीमुळे ६० हून अधिक वृद्ध लाभार्थींना दर महिना किमान शंभर रुपयाचे वाढीव साहाय्य देणे शक्य होणार आहे. श्री. कसबेकर यांची ही २३ वी देणगी असून या सर्व देणग्यांची एकूण रक्कम साडेअडसष्ट लाख रुपये एवढी आहे.

श्री. कसबेकर यांनी उभय काकांविषयी लिहिलेला 'तेथे कर माझे जुळती' हा लेख याच अंकात अन्यत्र छापला आहे.

देव बरें करूं.



## प्रकाश झोत

### देसाई कुटुंबीयांचे लॉस एंजेलीस येथे स्पृहणीय यश

लोणावळा येथील सुप्रसिद्ध साहित्यिका श्रीमती कुंदा र. देसाई व दिवंगत रघुवीर देसाई यांचा सुपुत्र श्री. मिलिंद हा लॉस एंजेलीस येथे एका प्रथितयश कंपनीत 'स्ट्रक्चरल इंजिनियर' म्हणून मोठ्या पदावर आहे. मिलिंदची सुविद्य पत्नी सौ. वैजयंती हीसुद्धा एका मोठ्या कंपनीत कार्यरत आहे. उभयतांचे दोघेही बुद्धिमान पुत्र विविध क्षेत्रांत चमकत आहेत. ज्येष्ठ पुत्र चि. विनीत हा अमेरिकेतील नामांकित विद्यापीठापैकी एक हार्वर्ड युनिव्हर्सिटी येथे वैद्यकीय (MD) शिक्षण घेत आहे. तेथे प्रवेश मिळविण्यापूर्वी त्याचे संशोधन निबंध प्रकाशित झाले आहेत. त्याचप्रमाणे **'आरक्षित'** समाजासाठी कार्य केल्याबद्दल त्याला फेलोशिप मिळाली आहे. हार्वर्ड विद्यापीठातर्फे आयोजित केलेल्या Lifestyle Medicine या कार्यक्रमासाठी हिज हायनेस **'दलाई लामा'** यांची मुलाखत घेण्याची त्याला संधी मिळाली होती.

मिलिंद यांचा धाकटा मुलगा रिषी हा दुसरे एक नामांकित विद्यापीठ 'स्टॅनफोर्ड' येथे कॉम्प्युटर सायन्सचे शिक्षण घेत आहे. त्याचेही दोन संशोधन निबंध प्रकाशित झाले आहेत. शाळेमध्ये असताना टॅलन्ट सर्च स्पर्धेमध्ये त्याला सर्वश्रेष्ठ पुरस्कार मिळाला होता. तो उत्तम पियानो वादक असून कॉम्प्युटर बरोबर संगीताचेही शिक्षण घेत आहे.

### जोगेश्वरी येथील लीना सलगर हिला 'फादर्स डे'च्या निबंध स्पर्धेत पहिले पारितोषिक.

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील डॉ. मृणालिनी व डॉ. रमेश सदाशिव सलगर हे एक सुसंस्कृत कुटुंब म्हणून परिचित आहेत. त्यांच्या कन्या लीना हिचे व्यक्तिमत्त्वही बहुरंगी आहे. पाककला, फोटोग्राफी, पर्यटन, लेखन, हस्तकला अशा विविध क्षेत्रांत ती पारंगत आहे. २० जून हा फादर्स डे म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. त्या निमित्ताने दिंडोशी येथील ऑबेरॉय मॉलतर्फे आपल्या वडिलांविषयी निबंध लिहिण्याची स्पर्धा ठेवली होती. त्यात पन्नास स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यात लीनाच्या निबंधाला प्रथम पुरस्कार मिळाला. लीना व डॉ. रमेश यांना हा पुरस्कार लवकरच प्रदान करण्यात येईल.

### श्रीमती मृणालिनी दळवी यांचे श्री मंगेश माहात्म्य

श्री मंगेश, श्री शांतादुर्गा आणि श्री महालक्ष्मी ही तीन आपली मुख्य कुलदैवते. पण आपणां सर्वांनाच त्यांच्याबद्दल खूपच कमी माहिती असते. तसे हल्ली लोकांचे वाचनही कमी झाले आहे. ठाण्याच्या मृणालिनी दळवी, (पूर्वाश्रमीच्या सीमा दिवेकर) यांच्या वाचनात ''मंगेश माहात्म्य''

ही पोथी आली. हल्लीच्या प्रथेप्रमाणे 'यु ट्युब'वरून सर्वांपर्यंत पोचवावी अशी त्यांना इच्छा झाली. मृणालिनी यांनी आपल्या मधुर आणि सुस्पष्ट अशा आवाजात या पोथीचे वाचन केले आहे. या पोथीचे एकूण १२ अध्याय आहेत. सर्व भाविकांनी याचा जरूर लाभ घ्यावा आणि आपल्या प्रतिक्रिया मृणालिनी दळवी यांना जरूर कळवाव्या.

**U Tube Site : https://youtu.be/-x4-bN7r04ll. Mrunalini Dalvi - 95940 79090.**

### बिणगे पालेकर कुटुंबीयांची गणेशमूर्ती बनविण्याची शंभर वर्षाची परंपरा

बिणगे येथील पालेकर कुटुंबीय हे तेथील फार प्रतिष्ठित घराणे समजले जाते. जुन्या पिढीतले त्यांच्यापैकी गोविंद हे कारवार कोर्टात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. त्यांचे बंधू घनश्याम हे मोठे जमीनदार होते व त्यांच्या आधिपत्याखाली पांच खेडी होती. गोविंदण्णांचे चिरंजीव दत्ताराम हे बिणगे येथे पोलीस पाटील होते. १९२० पासून त्यांनी हौसेने श्रीगणेशाची मूर्ती बनविण्याचा छंद जोपासला. ते प्रश्नशास्त्रामध्ये सुद्धा पारंगत होते. स्थानिक नागरीक त्यांच्याकडे विविध प्रकारच्या समस्या घेऊन येत असत व ते त्यातून योग्य तो मार्ग दाखवीत असत.स्थानिक कोंकणी भाषेत 'डाव मोडचे' असा एकवाक्प्रचार आहे. त्यानुसार सर्पांना बघूनच तो विषारी आहे की बिनविषारी ते अचूक सांगत. दत्तारामचे चिरंजीव गोविंद हे निवृत्त शिक्षक आहेत. ते साहित्यिकही आहेत. त्यांचे अनेक विषयांवरचे लेख स्थानिक वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून नेहमी प्रकाशित होत असतात. त्यांनी कोंकणी व कन्नड भाषांतून असंख्य चारोळ्या लिहिल्या आहेत. त्यांतील काही पुस्तिकांच्या स्वरुपात प्रसिद्धही झाल्या आहेत. तेसुद्धा गणेशाच्या मूर्ती बनविण्यात वाकबगार आहेत. गोविंदचा मुलगा गौरीश हासुद्धा मूर्ती बनवितो, म्हणजे या घराण्यात मूर्ती बनविण्याचे हे १०१ वे वर्ष आहे. वास्तविक फूट-दीड फूटांच्या मूर्तींचा बाजारभाव निदान एक हजार रुपये तरी असावा, पण पालेकर कुटुंबीयांच्या प्रथेप्रमाणे ते मूर्ती विक्रीला म्हणून ठेवत नाहीत. गिऱ्हाईक स्वखुशीने जे देतील ते स्वीकारतात.

### कु. अर्पिता वागळे हिचे स्पृहणीय यश

मुलुंड येथे राहणारे सौ. कविता व श्री. किरण आत्माराम (अता) वागळे यांची कन्या कु. अर्पिता वागळे ही अलीकडे सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या एम्.टेक (केमीकल अँड बायोटेक्नोलॉजी)च्या परीक्षेत ओ ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाली व तिला एम्.टेकमध्ये सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून सुवर्णपदक मिळाले. तिचा आता डॉक्टरेट करण्याचा मानस आहे. अर्पिताच्या स्पृहणीय यशाबद्दल तिचे हार्दिक अभिनंदन.



# प्रतिक्रिया

### श्रीमती कुंदा कुलकर्णी 'आठवणी दाटतात!'

''सौ. कुंदा कुलकर्णी'' हिच्याबद्दल मुखपत्रिकेत आलेला लेख वाचला आणि जवळ जवळ पासष्ट वर्षांच्या आमच्या मैत्रीचे सारे स्नेहल क्षण जणू काही फेर धरून मनापुढे साकार झाले!

आजची पिढी जेव्हा 'फ्रेन्डशिप डे' साजरा करते, तेव्हा मनात येतं ''हे आपण कधीच केलं नव्हतं!'' पण मैत्रीचे धागे तेव्हाही इतके अतूट असत, की प्रत्येक दिवसच **'फ्रेन्डशिप डे'** असायचा? माझ्या अन् कुंदाच्या मैत्रीचं स्वरूप हे असंच होतं?

खरं म्हणजे, अगदी बालपणापासूनची मैत्री ही खूप जवळीक करणारी असते. पण कुंदाचं बालपण गेले कारवारमध्ये, तर माझे पुण्यात! ती एस्.एस्.सी. झाल्यानंतर पुण्यात आई अन् भावाकडे आली. तिच्या आणि माझ्या आईची छान गट्टी होती. त्यामुळे, कुंदा पुण्यात आल्यावर तिच्या आईने तिला सर्वात आधी माझी ओळख करून दिली आणि अगदी आमच्या 'फर्ग्युसन कॉलेज'पासून सारे पुणे तिला दाखवायचं काम माझ्यावर सोपवलं!

आम्ही एकत्र केलेल्या भटकंतीमधून ते काम मी यथासांग पार पाडू लागले. त्यावेळी होणाऱ्या बोलण्यातून लक्षात आलं की, आमच्या आवडी समान आहेत. मुळात भाषा विषयांचीच ओढ असल्याने वाचनाची आणि लिहिण्याची आवड! गाणी ऐकण्याची आणि गाण्याची, भटकंतीचा आनंद घेण्याची आणि अर्थातच गप्पात रंगण्याचीही! त्यामुळे अगदी अल्पावधीतच आमचे सूर जुळले.

एकमेकींनी वाचलेल्या पुस्तकांबद्दल बोलणं, कॉलेजजवळ असलेल्या रेकॉर्डस्-लायब्ररीत जाऊन छान छान गाणी ऐकणं, घरात असलो, तर स्वत:ही गाणी म्हणणं, आणि अर्थातच, गप्पात रंगणं, हे ओघानेच येत असे. कॉलेजच्या 'बॉटॅनिकल गार्डन'पासून फर्ग्युसन टेकडी, एरंडवणा पार्क ते पेशवे पार्क, इतकंच काय, पण बंड गार्डनपर्यंतसुद्धा आमची पावले वळत! साध्या साध्या बोलण्यातूनही हसू फुटण्याच्या त्या वयात वेळ कसा जाई, ते कळतच नसे!
विवाहानंतर आम्ही दोघीही मुंबईतच स्थिरावलो. पण माहीम ते जोगेश्वरी नेहमी जाणं येणं होत नसे. शक्य असेल, तेव्हा संधी साधत असू. कुंदाची नणंद आणि मी एकाच कॉलनीत राहात असल्याने कुंदा तिच्याकडे आली की, मला भेटायचीच. एरव्ही फोनवरच संपर्क असायचा.

'आकाशवाणी'वर कार्यक्रम सादर करणे, हा आमच्या दोघींमधला एक समान धागा होता. एकमेकींचे कार्यक्रम आम्ही आावर्जून एकमेकींना कळवून ऐकत असू. नंतर त्याबद्दल फोनवर प्रतिक्रिया देत असू.

कुंदाच्या स्वभावाचा मुख्य पैलू, म्हणजे तिचा संदेवनशील स्वभाव! अत्यंत मृदु भाषा ही तिची खासियत होती! बुद्धिमान पण निगर्वी, आणि सदैव प्रसन्नवदना अशी कुंदा 'अरविंद गंडभीर हायस्कूल'मध्ये एक यशस्वी अध्यापिका म्हणून गणली जाऊ लागली. अभ्यासाव्यतिरिक्त वक्तृत्व, निबंध-लेखन, अभिनय या गुणांनाही उत्तेजन देऊन, स्वत: मदत करून तिने शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कौशल्याला वाव दिला. आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातल्या विद्यार्थ्यांकडेही खास लक्ष दिलं. या सर्व गुणांमुळे ती विद्यार्थीवर्गात प्रिय झाली, यात नवल ते काय?

कुंदा जोगेश्वरीहून अंधेरीला गेली, तरी आमच्या तुरळक का होईनात पण भेटी होत. पण ती पुण्यात गेल्यावर फोन हेच संपर्काचं साधन उरलं होतं.

शेवटी शेवटी आजारपणामुळे ती फोन करू शकत नसे. पण मी मधून मधून फोन केला, की माझ्या बोलण्यानेच तिचं समाधान होतं, एवढं मात्र ती सांगत असे आणि तिचा तेवढाच आवाज कानांवर पडला, तरी मलाही बरं वाटत असे !

दैवयोग असा की, ती गेली, त्याच्या काही मिनिटं आधीही मी तिला फोन केला होता. पण ती बोलू न शकल्यामुळे 'श्रद्धा'शी (तिच्या सुनेशी) बोलले. आणि त्यानंतर अल्पावधीतच आमच्या मैत्रीचा हा धागा निखळल्याचं श्रद्धाकडूनच कळलं!

'कुंदा' या जगात नसली, तरी आमच्या स्नेहबंधाच्या स्मृती सदैव जाग्याच राहतील! पण 'आठवणी दाटतात, धुके जसे पसरावे', हे अप्रिय सत्य स्वीकारणं भागच आहे!

**–नीलिमा शशिकान्त नाडकर्णी,** माहीम

९१६७७ ४५६२८/२४३० ९५४४

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| गौतम देवीदास तेलंग, बोस्टन | व | अपूर्वा माधव जोशी, बोस्टन |
| पद्मजा (गौरी) गिरीश वाघ, अंधेरी | व | गणेश योगेश पै, मुलुंड. |
| अनिला जयंत(बाळू) नाडकर्णी, अमेरिका | व | क्रिस्टोफर जॉन झाकी, अमेरिका. |

## वार्षिक स्नेहसंमेलनाविषयी सूचना

ज्ञातीतर्फे नोव्हेंबर २०२१ मध्ये होणारे यंदाचे **वार्षिक स्नेहसंमेलन** करोनाच्या संकटामुळे होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.



# प्रतिक्रिया

## 'वामनाश्रम एक आनंदाश्रम' – मुंगेरीलाल के हसीन सपने

माझा परममित्र श्री अरुण कसबेकर यांचा मुखपत्रिकेच्या मागील एका अंकात 'वामनाश्रम एक आनंदाश्रम' हा लेख प्रसिद्ध झाला होता. सदर लेख अरुणने अनेकांना वाचून दाखवला होता असे समजते. अशावेळी सर्वजण 'वाईटपण कित्याक' म्हणून खोलात न जाता 'लेख बरो आसा' म्हणून मोकळे होतात. पण 'अप्रियस्य च पथ्यस च वक्ता श्रोता च दुर्लभ:' या सुभाषितानुसार मित्रप्रेमापेक्षा समाजहित हे जास्त महत्त्वाचे म्हणून या तिखट प्रतिक्रियेचा प्रपंच.

वामनाश्रमाचा कारवार येथील भूखंड गेली कित्येक वर्षे 'हर्साच'पडून आहे. सातबाराच्या उताऱ्यात कुठल्याही व्यक्तीचा उल्लेख नाही. तेथे वास्तू उभारायची असेल तर नगरपालिकेला देण्यात येणाऱ्या अर्जावर भूधारकाची स्वाक्षरी लागेल. मूळ विश्वस्तांपैकी एकही हयात नाही. त्यामुळे मालकच अस्तित्वात नाही. थोडक्यात भक्कम पायाच नसेल तर इमले कसे बांधणार. उगाच स्वप्नरंजन करण्यात काय अर्थ आहे? मुंगेरीलाल के हसीन सपने! सध्या कारवार येथे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेही ज्ञातिबांधव नाहीत, जे आहेत त्यांतील कुणालाही या बाबतीत पुढाकार घ्यायची ताकद नाही, कर्तबगारी नाही, वेळ नाही व रस नाही. भूखंडावर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्यांना साधा पागारही बांधायला जमले नाही. सुमारे दोन दशकांपूर्वी ही जागा कैवल्यपूर मठाधीशाकडे सुपूर्द करण्याचे ठरले होते. पण पुढे प्रगती शून्य.

समजा जागा स्वामीजींच्या ताब्यात आली तर अरुणच्या वास्तु बांधण्याच्या स्वप्नाची मदार बँकेवर आहे. बँकेने बांधकामाचा खर्च करावा वगैरे मोठ्या मोठ्या उड्या. हे सर्व फजूल आहे. अरुणच्या स्वप्नानुसार पहिल्या मजल्यावर सुसज्ज दहा गाळे बांधावे. ते सांभाळणारी मंडळी कोण व तेथे कोण राहणार?

अरुण म्हणतो, 'स्वत:ला पाहिजे तसा मत्साहारासह आठवडा, दोन आठवडा कारवारला मस्त वास्तव्य' वगैरे. मुखपत्रिकेमुळे मी गेली चाळीस वर्षे ज्ञातिबांधवांच्या संपर्कात आहे व त्यांची मानसिकता मला माहीत आहे. तेव्हा मी जबाबदारीने सांगू शकतो की कोणीही कारवारला गेलाच तर सातेबाजाराशी संलग्न दोन किंवा तीनच दिवस राहील व हॉटेलमध्ये राहणे पसंत करेल.

सरळ आणि साधा पर्याय म्हणजे मठाधीशांनी कायदेकानूच्या आधारे हा भूखंड ताब्यात घ्यावा व तो निमूटपणे विकून टाकावा व मिळालेली रक्कम सदाशिवगडच्या मठाच्या जीर्णोद्धारासाठी वापरावी. खरेदीकाराला एकच अट घालावी की नूतन वास्तूचे नाव वामनस्मृती वामनभूवन, वामनकृपा वा तत्सम ठेवावे.

**– द. ना. नाडकर्णी,** पारले, फोन : २६१२४१६२.

## समुद्र अन् नदीच्या संगमावर विसावलेले रम्य स्थळ सदाशिवगड

**बहीणाबाई म्हणतात...**

**मन वढाळ वढाळ उभ्या पिकातलं ढोरं**

**किती हाकला, हाकला, फिरून येई पिकावर.**

मधुर आठवणी दाटतात. पंख घेऊन मन झेपावते. मन झेपावते ते एका ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या एका गावापाशी ते म्हणजे 'सदाशिवगड' माझा 'जन्मगाव'. माझे शिक्षण, माझा विवाह सगळं काही आठवते. ते 'शुकबाप्पा'चे घर. काळी नदी व अरबी समुद्राचा विलोभनीय संगम. छोटंसं बंदर आणि विसावलेल्या होड्या, गड, ती छोटीशी पांढरी शुभ वाळूची चौपाटी, समुद्रात वसलेली 'सुरु'ची वने, ते 'दुर्गम्मा'चे देऊळ 'पीरा'चा दर्गा, गडावरील तोफा, माझी शाळा, खेळाचे मैदान अन् लालभडक मातीचे रस्ते. किती लिहू? सगळं डोळ्यासमोर तरंगतं. मन भारावल्याप्रमाणे कोऱ्या कागदावर पेन घेऊन मी जुन्या आठवणींना उजाळा देते.

आमच्या 'मुखपत्रिके'मधून बरंच काही गडाबद्दल लिहिलं गेलं आहे, परंतु मला हा मोह टाळता आला नाही. माझे परममित्र श्री. डी. एन्. यांचे मला प्रोत्साहन मिळालं. त्यामुळे हा सारा खटाटोप. १९३७ साली माझा 'गडा'वर जन्म झाला. त्यावेळी G.S.B. लोकांची ८०% वस्ती होती. नाडकर्णी, वागळे, वर्टी, तेलंग वाघ, पालेकर, नाईक, गंडभीर, दिवेकर, सुखठणकर वगैरे लोकांची वस्ती होती. पुढे कालांतराने 'गडा'चे रंगरूप बदलले. आता एकच वाघ कुटुंबीय गडावर आहेत.

सह्याद्रीच्या हिरव्यागार वनश्रीने नटलेले, काळी नदीच्या विलोभनीय संगमावर विसावलेले रमणीय 'सदाशिवगड' पण आता आपण 'गड' असेच म्हणतो. समोर कारवार. कोडीबागला होडीतून जावे लागे. नंतर लाँच आली. असे म्हणतात की 'छत्रपती शिवाजी महाराजांनी' रक्षण करण्यासाठी 'सदाशिवराजा'ची नियुक्ती केली होती म्हणून या गावाला 'सदाशिवगड' नाव पडले असावे. गतकाळाच्या वैभवाची साक्ष देणाऱ्या 'दोन तोफा' तिथे आहेत. त्याशिवाय वनस्पतीने वेढलेली एक विहीर आहे. असे म्हणतात की या विहिरीत 'भुयार' असून शत्रूपासून बचाव करण्यासाठी या भुयाराचा उपयोग केला जात असे. गडावर जायला तीन/चार पायवाटा होत्या. उतारावर सुंदर 'दुर्गम्मे'चे देऊळ आहे. इथे जत्रा भरायची. कोंबडे कापले जात. विजया दशमीला देवीची प्रचंड मिरवणूक गावातून निघायची. तेव्हा गावकरी सडासंमार्जन करून तोरण बांधून, रांगोळी काढत असत. पालखी थांबली की 'पंचारत' ओवाळली जायची.

बंदराच्या चढणीवर जवळच गवताच्छादीत 'चहाचे दुकान' होते. पुढे संगमरवर दगडात बांधलेला लक्षवेधक 'पीराचा दर्गा' आहे. जवळच बकुळी (ओवळा) फुलांचा वृक्ष होता अन



त्याच्या बुंध्यापाशी 'करीमउद्दीन' भाई लिहिलेली पेटी होती. गावातील लोक मनोभावे पेटीत पैसे टाकत. गडाच्या उतारावर माझी मैत्रीण मातील रॉड्रीक्सचा सुंदर बंगला होता. गावात जाताना एक फाटा 'सावरपै'कडे जायचा. रस्त्याच्या दोन्ही बाजूला खाली शेती. लालभडक रस्ता, रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडं अन् लांबवर पसरलेल्या शेतातून दिसणारं 'कणसगीरी' गाव. सगळंच वर्णनापलीकडे. पूर्वी 'नाडकर्णी' सावरपै'ला स्थायिक झाले होते असे म्हणतात. माझ्या बालपणी आठवते ते त्या गावाच्या उंचावर असलेले 'पुरुषोत्तम काकां'चे घर. किल्ल्याचा 'पागार' अन् एक दर्गा. जवळपास मुसलमानांची वस्ती होती.

गावात छोट्या गल्लीला 'पांड' असे म्हणतात. गावात दुकानांची रीघ होती. जवळच 'पांडी'तून गेले की आधी 'दत्तमंदीर' लागते नंतर 'वाण्यावाडो'. मंदिरात दत्तजयंती, भजन कीर्तन असे. आम्ही प्रसादासाठी जात असू. आज आठवते की त्यामुळे आमच्यावर उत्तम 'संस्कार' झाले. वाण्यावाड्यात, महाजन, कुर्डेकर, नार्वेकर इत्यादी वाण्यांची वस्ती होती. मंदिराला खेटूनच 'शुकबाप्पा'चे घर होते. त्यावेळी गावात एका ख्रिश्चन व्यक्ती शिंप्याचे काम करी. आम्ही त्याला 'केप्पो' म्हणत असू. त्यासमोर अहमदचाचाचे दुकान होते. शशीचे चहाचे दुकान. भाऊ, यशवंत आणि दत्तू महाजनांची दुकाने. जवळच 'कानडीशाळा' अन् समोर 'मशीद' होती. कानडी शाळेजवळ एक वृक्ष होता. समोर भरपूर मोकळी जागा. त्या वृक्षाला आम्ही 'आजेझाड' म्हणत असू. तिथे 'मुसाफिरांना' 'गुराढोरां'ना विसावा मिळे. तिथे अनेक कार्यक्रम, भाषणे होत असत. जवळ आमची प्रिय 'सदाशिवगड हायस्कूल' आहे. शाळेमागे व पुढे कवायती, खेळाचा सराव, गॅदरींग होत असे. पूर्वी 'पेडा'कडे म्हणजे पराच्या जवळपास मासे विकायला कोळी बसत असत. नंतर शाळेजवळ 'फीश मार्केट' आले. जवळपास 'काकर तळे' असून पुढे 'वर्टीवाडा' अन् समोर शेती अन् आजूबाजूला कोंकण मराठा, भंडारी, कोमरपंतांची भरपूर वस्ती होती. बाजारपेठेत जाण्यापूर्वी 'पांडी' लागत असत. आठवते ते मा. प्रेमानंद नाडकर्णी'चे घर अन् पुढे वाटते 'देवबाग'ला जाण्याचा रस्ता. आता मला सगळे आठवत नाही.

रस्त्याच्या कडेला माझी 'मराठी शाळा' सातवीपर्यंत होती. आमच्या मुख्याध्यापिका, प.पू. मुझुमदार बाई, महाजन बाई अन् सुंदराबाई नाडकर्णी होत्या. त्यांनी आम्हाला घडवले. शाळेतील मास्तरांबद्दल मी पूर्वीच्या लेखात लिहिले आहे. सर्व मास्तरांची व बाईंची घरे जवळपास असल्यामुळे 'वेळे'चे महत्त्व कळले. पेडाजवळच मा. डॉ. कृष्ण वाघ यांचा दवाखाना होता व मा. काशण्णा कंपाऊंडर होते. त्या दोघांनी निरपेक्षपणे जनतेची सेवा केली. बाजारपेठ असल्यामुळे चहाची, किराणा मालाची, सोनाराची अन् कपड्याची दुकाने होती. तसेच 'बॅरटू' यांची गिरणही

होती. पेडाजवळून एक रस्ता ‘चित्ताकुला’ला जात होता. पुढे कणसगिरी, अस्नोटी अशी गावे असे आठवते. चित्ताकुलाला ‘महामाये’ची जत्रा भरायची. त्याला ‘तेर’ असे म्हणत असू. रथयात्रेला आम्ही जात असू. जत्रेत अनेक दुकाने त्यामुळे खूप गम्मत वाटायची. मला वाटते इतरांबरोबर ‘गडकर’ लोकांची वस्ती होती.

गावात आकर्षक म्हणजे ‘चर्च’ होय. फारच सुंदर आहे. जवळपास राहाणाऱ्या माझ्या ख्रिश्चन मैत्रिणी होत्या. मी सुद्धा सणासुदीला चर्चला जायची. ‘नाताळ’ खूप धुमधडाक्यात साजरा होत असे. रात्री मेणबत्त्या घेऊन ‘येशू ख्रिस्त अन् मेरी’ची भव्य मिरवणूक निघायची. आमचा ‘शिमगा’ अन् त्यांचा ’नाताळ’ आम्हांला खूप भावायचा. शिमग्याची दारी आलेली सोंगे तर नाताळात जिंगलबेल म्हणून येणारा ‘सांताक्लोज’ त्याच्या बरोबर ‘कानारा’ म्हणत येणारी सोंगे खूप गम्मत यायची. कधी ‘मरकमकार’ तरी कधी ‘नंदीबैल’ यांचीही धमाल आम्ही अनुभवत असू. गोव्याला जायच्या वळणावर ‘शिवाजी हायस्कूल’ नव्यानेच स्थापन झाले होते. त्यांच्याबरोबर ‘मॅचिस’ खेळत असू. जवळच रेतीत उगवलेली काजूची झाडे व तेथेच असलेली ‘स्मशानभूमी’ आठवते. शाळेसमोरून एक रस्ता ‘चित्ताकुला’ला जायचा. शाळेजवळ ‘वाघवाडा’ वगैरे होता असे आठवते. पुढे ‘चिंचेवाडा’ होता. रस्त्याच्या कडेला ‘फोव्ह’ कंडायचे दुकान आठवते. तिथेच गडाची शान म्हणजे ‘श्रीशारदांबा’ मठ. मठात सुंदर भव्य लक्षभेदक देवीची प्रसन्न मुद्रा. प्रांगणात दोन प. पूज्य ‘स्वामीं’च्या समाधी आठवतात. समोर ‘पेड’ होते. देवीची पालखी ‘वनभोजना’साठी निघायची. जवळपास राणे, सैल वगैरेंची वस्ती. मठासमोर ‘बाबुटमामा’ म्हणजे माजी मुख्याध्यापक सुखठणकरांचे घर अजून आहे. मामा सोवळ्याने समाधीला अन्नाचा नैवेद्य द्यायचे. पुढे त्यांचा वारसा माझे मेहुणे मा. सुखठणकरांनी चालवला. त्यांच्या बागेत ‘फोगा’ची म्हणजे काजूची व ‘मुसराद’ आंब्याची झाडे होती. मामा आम्हांला ‘फोगा’ची ‘गातनी’ सर करून द्यायचे.

रस्त्यावरून पुढे गेल्यावर समुद्राच्या खाडीवर बांधलेला ‘म्हाईनव्हाळ’ आहे. पावसाळ्यात सतत बुडालेला असे. इथे सदाशिवगडाची हद्द संपत असावी. पुढे बावळ, आंगडी माजाळी, पोळ्यामेट व गोवा असा हा गडावरचा प्रवास ‘पैंगिणी’ला माझ्या आजीकडे जाताना घडायचा.

बऱ्याचवेळा पूर्वी मी गडावर गेले आहे. पण काळाच्या ओघात ‘सदाशिवगडा’चा संपूर्ण कायापालट झाला आहे. गड फोडून ‘महामार्ग’ अन् ‘पूल’ बांधला आहे. कालाय तस्मै नम:।

आता या क्षणी मला माझी कविता आठवते

जीवनाच्या उत्तररंगी सुचलेली...



मिटल्या नयनांतुनि माझ्या आसवांचा पूर वाहे
आठवणी सांगू किती ? माहेर माझे दूर आहे.
बालपणी रेखाटले मी स्वप्न सुंदर भावनाच्या कुंचल्याने
आठवणी उध्वस्त झाल्या ते पहावे नशिबी आले
राहिल्या आता केवळ आठवणींचे असलेले धागे
जोडू कशी मी आता, उत्तररंगी तुटूनि गेले
अजुन जपल्या सुखद आठवणींचे ओझे भारी
परि जन्मोजन्मी साथ असावी प्रार्थना श्रीहरी

सर्व गडकर बांधवाना समर्पित

**– कुंदा र. देसाई**
**९८१९०५२३१९.**

**देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनम् जरा ।**
**तथा देहान्तर प्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ।।**
**(श्रीमद् भगवद्गीता १३/२)**



**पद्मभूषण डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी**
जन्म : ५ मार्च १९३०
देवाज्ञा ३१ ऑगस्ट २०२०



**श्रीमती सिंधु पद्माकर दुभाषी**
जन्म २० सप्टेंबर १९३८
देवाज्ञा १३ सप्टेंबर २०२१

*प्रेम देऊनी आम्हांला जवळ केले सर्वांना ।*
*उरली साथ तुमची आठवणी येते क्षणाक्षणाला ।।*
*कल्पनेतही नव्हते तुमचे जाणे अधुरे राहिले जीवन गाणे ।*
*आता फक्त एकच उरले तुमच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहणे ।*

**मेधा, देवदत्त, अर्चना (नात) जय (पणतू)**

# तेथे कर माझे जुळती !

**१. श्री. पी.डी. कसबेकर**



माझे काका श्री. प्रभाकर दत्तात्रय कसबेकर, यांची १ ऑक्टोबर २०२१ ही जन्मशताब्दी. प्रभाकरकाकांचा जन्म १ ऑक्टोबर १९२१ रोजी कारवारला झाला. त्यांचा मूळ गाव खारगे. माझ्या बाबांपेक्षा काका १२ वर्षांनी लहान होते.

प्रभाकरकाकांचे एकंदर वर्णन केवळ एका वाक्यातच करावयाचे असेल तर असे म्हणता येईल की, प्रत्येक जोडपे परमेश्वराकडे आपल्या होणाऱ्या बाळाबद्दल जे काही मागते ते सर्व जर संपूर्ण मिळाले तर ते बाळ कसे होईल, त्याचे संपूर्ण आयुष्य कसे राहील वगैरे... अगदी तसेच माझे प्रभाकरकाका होते.

**आपल्या हयातीत काकांनी शाळा/कॉलेजात प्रथम स्थान कधीच सोडले नाही.**

* १९३८ साली हिंदू हायस्कूल कारवारमधून मुंबई प्रेसिडेन्सीच्या मॅट्रीक परीक्षेत सर्वप्रथम, कदाचित माझ्या पायगुणामुळेच असेल. कारण माझा जन्म १९३८ चाच!
* इंटर आर्टस् परीक्षेत मुंबई विद्यापीठातून १९४० मध्ये सर्वप्रथम, इतकेच नव्हे त्यांना आठही पेपर्समध्ये सर्वाधिक मार्कस्. श्री. सी.डी. देशमुखांचा ८ पैकी ६ त सर्वाधिक मार्कस्चा विक्रम, श्री. प्रभाकर कसबेकरांनी तोडला. काकांचा हा विक्रम अजूनही २०२१ मध्ये – ८१ वर्षांनंतरसुद्धा अबाधित आहे.
* १९४२ साली B.A. (Hons.) Economics मध्ये मुंबई विद्यापीठातून पहिले आले.
* महाराष्ट्राचे चीफ सेक्रेटरी – या महाराष्ट्र शासनाच्या अत्युच्च पदावरून ते निवृत्त झाले.

अत्यंत तल्लख बुद्धीच्या काकांनी शासनाच्या विविध योजनांमध्ये खूपच सुधारणा केल्या. जास्तीत जास्त योजना लवकरात लवकर राबवून शासनाचा वेळ आणि खर्च यात खूपच बचत केली. त्याबद्दल शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना तसेच संबंधित मंत्रीगणांना काकांबद्दल अत्यंतिक आदर होताच, पण या आदरापेक्षा अधिक आकस/द्वेषही होता. कारण काकांमुळे त्यांची इतर कमाई अगदीच बंद पडली होती. काकांना कधी एकदा आपल्या विभागातून बाहेर घालवतो याची त्यांना घाई असे. नाईलाजाने त्यांना, जरुरी पडल्यास काकांना प्रमोशनवरसुद्धा आपल्या विभागाच्या बाहेर घालविण्याची घाई असे.



काका दिल्लीत Chief Controller, Import-Export (GOI) या पदावर होते व तत्कालीन महाराष्ट्रीयन केंद्रीय मंत्र्यांनी त्यांना हैदराबादला असलेल्या त्यांच्या मित्राच्या काही कामाबद्दल काकांना विनंती केली होती. काकांनी अगदी स्पष्टपणे तसे करण्यास नकार दिला. तेव्हा संतापून मंत्रीसाहेबांनी काकांची मुंबईला बदली करण्याची धमकी दिली. काकांनी त्यांना स्पष्ट सांगितले की, ''त्यांचे बेडींग नेहमीच बांधलेले असते व ते त्याच दिवशीसुद्धा मुंबईला जायला तयार आहेत.''

या सर्व गोष्टींचा काकांना खूपच मनःस्ताप होई, पण त्यांनी चुकूनसुद्धा त्यांचे आय.ए.एस.मधील सहकारी तर सोडूनच द्या, स्वतःच्या पत्नीबरोबरसुद्धा कुठल्याही शासकीय विवंचनेवर कधी चर्चाही केली नाही किंवा संबंधित मंत्रीगण किंवा इतर कोणावरही टीका केली नाही.

काकांची फक्त एकाच व्यक्तीवर श्रद्धा होती आणि ती म्हणजे माजे बाबा–काकांचे दादा. बाबा काकांचे म्हणणे काळजीपूर्वक आणि शांतपणे ऐकून घेत व दोघेही आपसांत काय उपाययोजना करावी वगैरे निश्चित करीत. दोघांचे एकमेकांवर विलक्षण प्रेम आणि आदर होते.

या बाबतीत एकच उदाहरण देतो, काकांची दोन वर्षांकरिता रिझर्व बँकेमध्ये अॅग्रीकल्चर अँड क्रेडीट डिपार्टमेंट (ACD) मध्ये डेप्युटेशनवर चीफ ऑफिसर म्हणून नेमणूक झाली. त्यांचा मोठ्या थाटाने स्वागत समारंभ झाला. व्यासपीठावर रिझर्व बँकेचे गव्हर्नर व इतर विभागांचे मुख्य अधिकारी होते. माझे बाबा प्रेक्षकांमध्ये पहिल्या ओळीतच बसले होते. श्री. मलुष्टे जे माझ्या वडिलांचे बॉस होते, त्यांनी संध्याकाळच्या काहीा प्रोग्रामबद्दल काकांना विचारणा केली. काका दिल्लीहून नुकतेच आल्याने आमच्याच घरी उतरले होते. तेव्हा त्यांनी मलुष्टेना सांगितले की, आधी दादांना विचारतो, त्यांची परवानगी घेतो व नंतर तुम्हाला काय ते कळवितो. तर मलुष्टे म्हणतात, ''तू तर आता रिझर्व बँकेमध्ये तुझ्या दादांपेक्षा सिनीयर पदावर आलेला आहेस. तुला दादांच्या परवानगीची काय गरज आहे?'' तर काका म्हणाले, ''जरा हळू बोला! दादांनी ऐकले तर तुम्हां सर्वांच्या देखतच माझ्या गालावर एक ठेवून देतील.'' माझ्या बाबांनी प्रत्येक शब्द ऐकला होता. किती धन्य वाटले असेल त्यांना! असे होते या बंधूंचे संबंध, एकमेकांबद्दल अत्यंतिक आदर, विश्वास आणि प्रेम.

श्री. चिंतामणराव देशमुख, अर्थमंत्री असताना योगायोगाने काका त्यांचे शासनातर्फे नेमलेले खाजगी सचिव होते. काही निमित्ताने एके ठिकाणी श्री. देशमुखांचा सत्कार करण्यात आला होता. देशमुखांनी आपले सर्व भाषण संस्कृतमध्ये केले ते ऐकून आयोजकांचे धाबे दणाणले. या भाषणाचे उत्तर संस्कृमध्येच देणे समयोचित होते. मोठा इभ्रतीचा प्रश्न होता! मोठ्या

काकुळतीने सर्व आयोजक काकांकडे आशेने बघत होते. शेवटी, काका आपल्या जागेवरून उठले व त्यांनी अस्खलीत संस्कृतमध्ये 'एक आम नागरिक' या नात्याने आभार प्रदर्शन केले.

मंत्रालयासमोर असलेल्या '' ललित '' नावाच्या इमारतीमध्ये खासकरून निवृत्त आय. ए. एस. अधिकारी राहातात. काका स्वत: सुरुवातीला त्या प्रोजेक्टचे मुख्य कर्ता होते (sponsor). केवळ त्यांच्यामुळेच ती मोक्याची जागा सोसायटीला अगदी नगण्य किंमतीला मिळाली होती. पण नंतर सभासदांना बांधकामाचे भरावे लागणारे हप्ते न भरता आल्याने त्यांनी आपले नाव त्या हाऊसिंग सोसायटीतून काढले आणि चेंबूरच्या जवळ देवनार येथे घर घेतले. तेही बँकेकडून कर्ज घेऊन. जे फेडायला त्यांना बरीच वर्षे लागली.

मी महापंचमी पूजा वर्षातून पाचवेळा स्वत: यथासांग करीत असे आणि अजूनही करीत आहे. त्यावेळी काका-काकी न चुकता पूजेला देवनारहून येत असत. तेही बेस्टच्या बसेसमधून! कारण त्यांच्या जुन्या-पुराण्या फियाट गाडीला लागणारा पेट्रोलचा खर्च त्यांना परवडत नव्हता. दारात उभी असलेली शासनाची गाडी ते स्वत:च्या वैयक्तिक कामाकरिता वापरीत नसत.

अतिशय तल्लख बुद्धिमत्ता, कामतत्परता आणि कमालीची प्रामाणिकता एकवटलेले माझ्या जीवनातील एक महापुरुष - माझे काका - श्री. प्रभाकर दत्तात्रय कसबेकर यांना माझा आदरपूर्वक दंडवत!

**२. श्री. आनंद दत्तात्रय कसबेकर**

प्रभाकर काकांपेक्षा तीन वर्षांनी मोठे माझे एक काका होते. पण ते वयाच्या १४ व्या वर्षीच सर्वांना सोडून गेले. त्यांचे नाव आनंद! मी जवळ-जवळ पाच वर्षे शालेय शिक्षणानिमित्त कारवारला आजी-आजोबांकडे होतो. पण एकदासुद्धा आजी-आजोबांच्या तोंडून ''आनंद'' हा शब्द ऐकला नाही. बोलतानासुद्धा आजी-आजोबा ''आनंद'' शब्द मोठ्या कटाक्षाने टाळीत असत. आजींचे रोज संध्याकाळी पोथीवाचन असे व ते ऐकण्यास जवळपासच्या पाच-सहा गृहिणी येत असत. पोथीवाचनात जर ''आनंद'' शब्द आल्यास आजी त्याऐवजी ''आल्हाद'' हा शब्द उच्चारीत असे. हे कोडे कारवारहून मुंबईला जेव्हा मी आलो, तेव्हा आत्यांना तसेच बाबांना खोदून विचारून मी आनंदकाकांची माहिती काढली.

आनंदकाका अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. त्यावेळी कारवारांत ''स्काऊट''ची स्थापना झाली नव्हती. आनंदकाका वयाच्या अवघ्या १२-१३ वर्षांचे असतानासुद्धा देशभक्ती आणि स्वातंत्र्य लढ्यामध्ये सक्रीय होण्यास अगदी आतूर झाले होते. त्यांनी कारवारांत समवयस्क मुलांची एक ''वानरसेना'' स्थापन केली होती. या सेनेकडून सभा, मिरवणूका अगदी



नियमितपणे आयोजित केल्या जात. काकांची वक्तृत्वशैली, सभा मिरवणूका आयोजित करण्यामागील त्यांचे कौशल्य, स्वातंत्र्यलढ्यासंबंधी या १३ वर्षांच्या मुलाची आस्था, लीडरशिप क्वालिटी, चळवळींच्या विविध मुद्देसूद योजना, त्यावेळच्या कारवारच्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. सुरुवातीला लहान पोरांच्या छोट्या मोर्चाचे मोठ्या मोर्चात असे रूपांतर होत असे व त्याला कारणीभूत असलेल्या १३ वर्षांच्या आनंदकाकांच्या प्रत्येक हालचालीवर त्यांची बारीक नजर होती.

या सर्व चळवळींत सक्रीय भाग घेतलेले आनंदकाका, आपले मूलभूत जबाबदारीपण अगदी योग्यरीतीने पार पाडत होते. आजोबांना त्यांचे मित्र, शेजारी-पाजारी म्हणत, ''तुमच्या पोराला जरा आवरा! इतका मोकळा सोडू नका! सबंध दिवस इतर पोरांना घेऊन हुंदडत बसतो. जरा त्याला शाळेच्या अभ्यासाकडेही लक्ष द्यायला सांगा म्हणजे त्याचे कल्याण होईल.'' आजोबा हसत-हसत म्हणत, ''मी त्याला काय सांगू, तो वर्गातसुद्धा नेहमी पहिला नंबरच येतो.'' असे हे आमचे आनंदकाका!

एकदा तर त्यांच्या मोर्च्यावर पोलीसांचा लाठीमारही झाला होता. आनंदकाकांना पोलीसांनी पकडून चौकीवर नेले व त्यांना बेदम मारहाणही केली. त्यावेळी आनंदकाका १४ वर्षांचे होते. दोन दिवस त्यांना चौकीतच डांबून ठेवले व त्यांच्यावर अनन्वीत अत्याचार केले गेले. जेवणही बरोबर दिले नाही. जखमांवर मलमपट्टी करणे तर दूरच राहिले. दोन दिवसांनंतर त्यांची अगदी नाईलाजास्तव सुटका करण्यात आली. एकतर ही अटक बेकायदेशीर होती. कारण आनंदकाकांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी होते व दुसरे कारण आनंदकाकांची प्रकृती कमालीची ढासळली होती. त्यांना अतिसाराची व्याधी लागली होती व रक्तस्रावही खूप होत होता. उपचारासाठी ताबडतोब आवश्यक असलेली इंजेक्शन्स त्यावेळी सबंध कारवारात उपलब्ध नव्हती. त्याच अवस्थेत त्यांना घरी आणण्यात आले व घरीच त्यांचा अंत झाला. केवळ १४ वर्षांच्या आनंदकाकांच्या अंत्ययात्रेला बराच मोठा समुदाय हजर होता.

अशा माझ्या आनंदकाकांना माझा साष्टांग नमस्कार!

आपला देश एका महान गुणी नेत्याला मुकला!!!

**-अरुण भास्कर कसबेकर**

९८२०२९१३६५

८७७९९८६६०६

## BIRTH CENTENARY OF SHRI P.D. KASBEKAR

**Our Baba: Firm, Fair and Fun**

Nowadays, during my early morning swim, I often think of my father who first taught me how to swim. I have hazy memories about being dipped into the sea in Goa when I was two. At eight he bought me a set of Arthur Mee's The Children's Encyclopedia. He consulted this encyclopedia for the best freestyle and breastroke techniques that he then incorporated when teaching me to swim at the Poona Club. He himself learned to swim in the open sea in Karwar, preferring the sidestroke.

